# आत्मचित्र – भाग ४७

(कै. राम गबाले यांच्या 'आत्मचित्र' या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून क्रमशः)

कधीकधी आम्ही मुंबईत असताना नियोजित मैफिल जमायची असली, की पी.एल.चा मला कटाक्षानं निरोप येत असे "पार्ल्याला आम्ही सगळे जमणार आहोत. बाबासाहेब पुरंदरेंचं व्याख्यान आहे किंवा वसंता (देशपांडे) आलाय. रात्री बसणार आहोत. तू काय करतोस - येना!" मग अनियोजित मैफिल रात्री

साडे दहा-अकराला सुरू होत असे आणि पहाटे साधारणपणे आम्ही दुरून आलेले दूधवाल्या भैय्यांच्या सोबतीनं आपापल्या घरी परतत असू.

पार्ल्याला पी.एल.चं फार मोठं गोत होतं. कित्येकजण आपापल्या जागी अवलिया असायचे. त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा पी.एल. त्यांच्या समोरच परिचय करून देत असे. त्यातले काही सदैव लक्षात राहण्यासारखे.

त्यातले एक खास कल्पक. त्यांच्या वागण्याचा कधीही अंदाज बांधता येत नसे. ते त्यांच्या कॉलेज वयात - म्हणजे विद्यार्थी दशेत असताना एकदा त्यांनी समोरून येणाऱ्या अनोळखी बाईंना रस्त्यावरच एकदम चक्क वाकून नमस्कार केला. त्या मध्यम वयस्कर बाई एकदम घाबरून सावरल्या; तर हे म्हणतात, "काही नाही परीक्षेला निघालोय. समोरून सवाष्ण येताना दिसलात म्हणून नमस्कार केला."

एकदा आपल्या मित्राबरोबर चर्चगेटपासून पार्ल्यापर्यंत प्रवास करत असताना हे तिकिट चेकर दिसला की त्याला चकवून डबा बदलत असत. तिकिट चेकरनं त्यांची ही चलाखी हेरली आणि तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्याची शिकार मिळणार, या इराद्यानं त्यांच्यावर नजर ठेवून तोही त्यांच्या मागे मागे येत राहिला. असे डबे बदलता बदलता विलेपार्ले स्टेशन आलं. यांनी उडी मारली आणि धावत सुटले. तिकीट चेकरही पार्ल्याला उतरून आपली जाड पावती पुस्तकं आणि पेन्सिली सावरीत त्यांच्या मागे धावत पाठलाग करत गेला. पार्ल्याचं गेट आल्याबरोबर ही स्वारी थांबली. चेकरनं त्यांना पकडलं आणि विचारलं, "तिकिट?" यांनी शांतपणे खिशातून पास काढला आणि दाखवला. चेकरनं खजील होऊन विचारलं, "मग तुम्ही पळत का होता?" हे म्हणाले, "खरं तर मी थांबलो तो तुम्हांला विचारायला. तुम्ही का धावत होतात?" चेकर चिडून पुटपुटला, "पास होता तर मग तुम्ही पळत का होता?" पास उघडून दाखवून हे गृहस्थ म्हणाले, "या पासवर कुठंच लिहिलेलं नाही. पासहोल्डर शुड नॉट रन."

लोकांच्या फिरक्या घेणं किंवा विचित्र वागणं याची स्वभाववृत्ती असणाऱ्या कोल्हापूरच्या एका कलाकाराची गोष्ट आठवली. ती मी ऐकवली. खरं खोटं, देव जाणे. दिनकर कामण्णा म्हणून कोल्हापुरात एक अतिशय हुशार कलाकार होता. कोल्हापुरात पूर्वी कापड विकणारे विक्रेते फेरीवाले खांद्यावर लुगड्याच्या घड्या, बायकांच्या चोळ्यांसाठीचे खण, ब्लाऊजसाठीचे कपडे रस्त्यावर आरोळी देत विकत असत. 'एऽऽऽ खणय्यऽऽऽ' असं जोरात ओरडत. दुपारच्या वेळी फारशी गर्दी नसताना असा फेरीवाला समोरून येत असताना बघून या स्वारीनं

एकदम वाकून त्या फेरीवाल्याचे पाय धरून नमस्कार केला. फेरीवाला गांगरला आणि म्हणाला, "काय हो काय?" कामण्णा म्हणाले, "काही नाही...आपल्या आयाबायांची अब्रू राखतोस, बाबा, म्हणून पाय धरले." एवढं म्हणून चालू लागले.

असल्या गोष्टींच्या विरंगुळ्यातच तरंगत असताना पुन्हा जमिनीवर आणायला आमच्या हिंदी चित्रपटाच्या निर्मात्यांचा फोन आला.

आमच्या 'दूधभात' चित्रपटावरून होणाऱ्या 'तन्हाई'नावाच्या हिंदी चित्रपटाची प्रगती पूर्णपणे खुंटली होती. कारण मध्यंतरी सतरा-अठरा वर्षं होऊन गेली होती, तरी 'तन्हाई' पुरं करण्याच्या दृष्टीनं निर्माते मधून-मधून उचल खात होते. पण काही कलाकार काळाआड निघून गेले होते. काही साहजिकच वयस्कर झाले होते, हे चित्र आता पुरं होण्याची सुतराम शक्यता नव्हती. फक्त हे आता पुरं करता येईल का, असा विचार दोन पाच वर्षांनी होत असे. काही केलं तरी कलाकारांची वयं झाल्यानं कोंडी होत असे. आम्ही पुन्हा नाद सोडून देत असू. आमच्या विचारात कधी कधी के.ए.अब्बास सहभागी होत असत. एकदा एक लेखक आणि निर्माते आणि एक-दोन मित्र असे आम्ही चर्चा करत बसलो असताना एक-दोन मित्रांनी अस्वस्थतेतून फारच सिगारेटी ओढल्या. तो धूर काहीसा असह्य झाल्यानं मी दरवाजा उघडून बाहेर निघून गेलो. थोड्या वेळानं मी आत आलो आणि आपल्या निर्मात्यांना, लेखकांना प्रश्न विचारला, "चला, आपण थोडा असा विचार करूया, सगळ्यांत प्रथम खरी अडचण काय आहे?" आमचे लेखक म्हणाले, "कारण सर्वच गोष्टीत खंड पडला आहे. अठरा वर्षं म्हणजे काही कमी नाहीत. काही कलाकार तर हयातही नाहीत. हीच खरी अडचण आहे. काही करता येणार नाही."

"चला, समजा सतरा-अठरा वर्षं खरंच कथानकातही गेली आहेत तर आता काय काय झालं असेल?" हा प्रश्नही मीच विचारला आणि उत्तरही मीच द्यायला सुरुवात केली, "समजा, हा सहा-सात वर्षांचा मुलगा आता पंचवीस-सव्वीस वर्षांचा झाला आहे. तो डॉक्टर आहे..." जयराजजींचा मुलगा दिलीपराज आणि सुरेखा ही 'शहर और सपना'ची जोडी डोळ्यांसमोर होती... उषाबाई खूप वयस्कर झाल्या आहेत. त्या पन्नाशीच्या पुढच्या दिसतात. खूप निराळ्याही झाल्या आहेत. त्या या मुलाच्या आई म्हणून शोभून दिसतील. पूर्णिमाच्या पतीचं काम केलेल्या कलाकाराचं देहावसान झालं आहे. कन्टिन्युइटीचा प्रॉब्लेम येईल म्हणून पूर्णिमाजींची भूमिका विधवेची ठेवायची. आता बांधू या, कथानक

झालेलं शूटिंग फ्लॅशबॅकमध्ये वापरून पूर्वसंच जमवता येईल का?''

निर्मात्यांना खूपच हुरूप आला आणि म्हणाले, ''रामजी, असेच अब्बास साहेबांच्याकडं जाऊ आणि त्यांच्याशी बोलू.''

आम्ही जुहूला अब्बास साहेबांच्याकडं गेलो. मी प्रथमच अब्बास साहेबांची या विचित्र कल्पनेबद्दल क्षमा मागितली आणि पूर्ण कल्पना आणि साधारण योजना बोललो. अब्बास साहेब म्हणाले, ''गबाले, ग्रेट ब्रेनवेव्ह! आपण कामाला लागू, गोष्ट बांधू. आधी प्रथम केलेलं शूटिंग पाहू.'' जेवढं झालं होतं तेवढा भाग संकलित केला होताच.

या साऱ्या प्रकारानंतर एक आगळीच अशक्य गोष्ट शक्य झाली. काही लाख रुपये काम अपुरं राहिल्यानं पाण्यात गेले होते ; ते बचावतील, वसूल होतील, ही शक्यता निर्माण झाली. शिवाय त्या चित्राचं नावही बदललं. 'बडी माँ' हे नाव ठरलं. यात मेकअप बदलून वगैरे काही न करता उषा किरणनं वृद्ध आईचं काम अतिशय सुरेख केलं. मूळचा कथेचा गाभा होताच. शिवाय महंमद शफीसाहेबांचं एक शीर्षकगान इंदीवर यांनी लिहिलेलं होतं. असा सगळा साज चढवून; म्हटलं तर काही जुनं आणि काही नवं असं 'बडी माँ' हे चित्र तयार झालं. सेन्सॉर झालं. त्या चित्राच्या खूप प्रिंटस विकून त्या चित्राचे पैसे वसूलही झाले. हा एक अगदी आगळा प्रयोग होता. पटकथा लेखनाची जणू एक कसरत होती. या चित्रपटाचं इंदीवरनी लिहिलेलं शीर्षकगान आहे. 'जनम दिया जिस माँने, उसने भी उपकार किया। उससे बडी माँ वो है, जिसने माँ का प्यार दिया। इस दुनियामें सब को प्यारी अपनीही सन्तान है। बेगानोंको अपना माने उनका प्यार महान है।' गायक महंमद रफी होते.

मध्यंतरी अनेक वर्षं गेली असल्यानं हा चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित न करता त्या निर्मात्यांनी त्याच्या बऱ्याच कॉपीज विकून अर्थ प्राप्ती केली. त्यांना असं करणं योग्य वाटलं, कारण त्यांना आर्थिक नुकसान दाखवायचं असावं. चित्र उत्तम होऊनही अशा व्यावहारिक फायद्याच्या कारणांनी ते प्रदर्शित झालं नाही, याचं मला खूप वाईट वाटलं.

– कै. राम गबाले

('आत्मचित्र' पुस्तकासाठी भारतातील संपर्क – अरुण जाखडे – २५४४२४५५)